| | | |
|---|---|---|
| MHNG090009212021 | दाखल दिनांक | १७/०५/२०२१ |
| | नोंद दिनांक | १७/०५/२०२१ |
| | न्यायनिर्णय दिनांक | ०४/०५/२०२६ |
| | कालावधी | ०४व. ११म. १७दि. |

# फॉर्म नं.XXXII

## भाग–अ

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(i) अन्वये)

## प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.१), सावनेर यांचे न्यायालय

(पिठासीन अधिकारी प्रदिपसिंह पृथ्वीराजसिंह ठाकूर)

(दिनांक ०४/०५/२०२६ )

(नियमित फौजदारी खटला क्र. १३१/२०२१) नि.क्र.१९.

अपराधः भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ अन्वये.

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र सरकार तर्फे**<br>सावनेर, पोलीस ठाणे,<br>ता. सावनेर, जिल्हा नागपूर. |
| **विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता** | **श्री. टी. एस. आरगे** |
| **आरोपी** | **दिनबंधू जगदिश शेंभेकर,**<br>वय ३९ वर्षे, व्यवसाय– खाजगी,<br>रा. होळी चौक, सावनेर,<br>ता. सावनेर, जि. नागपूर. |
| **आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ** | **श्री. पी.एन.काळे** |

## भाग–ब

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(ii) अन्वये)

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ११/१२/२०२० |
| फिर्याद दाखल दिनांक | १२/१२/२०२० |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | १७/०५/२०२१ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | २४/०९/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १९/०१/२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | -- |
| न्यायनिर्णय दिनांक | ०४/०५/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | निरंक |

## आरोपींची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वाये समायोजीत करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **दिनबंधू जगदिश शेंभेकर** | २०/०४/२०२१ | २०/०४/२०२१ | भारतीय दंड विधान,१८६० कलम ३७९ अन्वये | **निर्दोष मुक्त** | निरंक | निरंक |

## भाग–क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(iii) अन्वये)

## अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. अभियोग पक्ष

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | अक्षय अनिल रामटेके | फिर्यादी | ४ |

**ब. आरोपी** (साक्षीदार तपासणेत आला असल्यास)

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे स्वरुप | नि.क्र. |
|---|---|---|---|
| १. | निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालय** (साक्षीदार तपासणेत आला असल्यास)

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे स्वरुप | नि.क्र. |
|---|---|---|---|
| १. | निरंक | निरंक | निरंक |

## अभियोग पक्षाने/आरोपीने/न्यायालयाने सिध्द झालेली/निशाणी पडलेली कागदपत्रे

**अ. अभियोग पक्ष**

| अ.क्र. | नि.क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १. | नि.क्र.५ | फिर्याद |
| २. | नि.क्र.६ | प्रथम खबरी अहवाल |

**ब. बचावपक्ष** (बचावपक्षातर्फे खालील कागदपत्रे मान्य करण्यात आली आहेत.)

| अ.क्र. | निशाणी | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**क. न्यायालयाने निशाणी दिलेली कागदपत्रे**

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक. |

## ड. मुद्देमाल

| अनु.क्र. | आर्टीकल क्रमांक | मुद्देमालाचा तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## न्या य नि र्ण य

(घोषीत आज दिनांक ०४ माहे मे, २०२६ रोजी)

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ अंतर्गत खटला चालविण्यात आला.

**०२.** अभियोगपक्षाचा खटला थोडक्यात असा की, फिर्यादी अक्षय रामटेके हा दिनांक ११/१२/२०२० रोजी आठवडी बाजार सावनेर येथे भाजीपाला घेण्याकरीता गेला होता. फिर्यादी अंदाजे १६.३० वाजताच्या दरम्यान भाजीपाला खरेदी करुन जयस्तंभ चौक, सावनेर येथून त्याच्या मोपेडने घरी परत असतांना काही दुर अंतराव त्याला समजले की, त्याच्या लोअर पॅन्टच्या खिशात असलेला रेडमी कंपनीचा मोबाईल कोणी अज्ञात चोराने चोरी केला. करीता, फिर्यादी हा जयस्तंभ चौक येथे परत गेला आणि त्याच्या मोबाईलचा शोध घेतला, परंतू त्याचा रेडमी कंपनीचा मोबाईल त्याला मिळून आला नाही. नंतर फिर्यादी त्याच्या घरी गेला व रात्रभर त्याच्या चोरी गेलेल्या मोबाईलवर कॉल करुन पाहले असता, मोबाईल बंद होता. करीता, फिर्यादीने सावनेर पोलीस स्टेशन येथे फिर्याद नोंद केली.

०३. सदर फिर्याद वरुन सावनेर पोलीसांनी गुन्हा क्र.७१२/२०२० नोंदविला. सदर घटनेचा तपास पोलीस हवालदार/१२९७ श्री.नारायण बोरकर यांच्याकडे सोपवण्यात आला. तपासादरम्यान तपासी अधिकारी यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळ पंचनामा तसेच आरोपीचा निवेदन व जप्ती पंचनामा तयार केला, आरोपीस अटक केली. तपासाअंती, पुरावा हाती आल्यामुळे आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

०४. दोषारोपपत्र व त्यामध्ये सामिल कागदपत्रांच्या आधारे आरोपीविरुध्द दोषारोप (नि.क्र.२) ठेवला, तो आरोपीस वाचून व समजावून सांगितला असता, आरोपीने गुन्हा नाकबूल (नि.क्र.३) केला व संपरिक्षणाची तयारी दर्शवली. आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द करण्याकरिता पुरेसा दिसून आला नाही. त्यामुळे जरी आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वयेचे निवेदन नोंदविण्यात आले नाही. विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीचे विधीज्ञ यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षाचा युक्तीवाद व अभिलेखावरील पुराव्यावरुन खालील मुद्दे माझ्या निदर्शनास आले. त्यावर मी माझ्या कारणमिंमासेसह खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवित आहे :-

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ११/१२/२०२० रोजी सायंकाळी ४.३० वाजताच्या दरम्यान जयस्तंभ चौक, सावनेर, ता.सावनेर, | |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | जि. नागपूर येथे आरोपीने फिर्यादी अक्षय अनिल रामटेके यांच्या लोअर पँटच्या खिशातून जूना रेडमी कंपनीचा मोबाईन चोरुन नेला व त्याद्वारे त्यांनी **भारतीय दंड विधान, कलम ३७९** अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | **नकारार्थी.** |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## का र णे मि मां सा

**मुद्दा क्र.१ करीताः –**

**०५.** प्रस्तूतच्या खटल्यामध्ये आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत करणेसाठी अभियोग पक्षाने हे शाबीत करणे गरजेचे आहे की, दिनांक ११/१२/२०२० रोजी सायंकाळी ४.३० वाजताच्या दरम्यान जयस्तंभ चौक, सावनेर, ता.सावनेर, जि. नागपूर येथे आरोपीने फिर्यादी अक्षय अनिल रामटेके यांच्या लोअर पँटच्या खिशातून जूना रेडमी कंपनीचा मोबाईन चोरुन नेला.

**०६.** आरोपीवरील गुन्हा शाबीत करणेसाठी अभियोग पक्षाने केवळ ०१ साक्षीदार तपासला आहे. साक्षीदार क्र. ०१ अक्षय अनिल रामटेके हा फिर्यादी असून त्याने त्यांच्या पुराव्यात तो आरोपीला ओळखत नसल्याचे कथन केले. तसेच सन २०२० मध्ये तो शूक्रवारी गोल मार्केट, सावनेर येथे ४.३० वाजताच्या

सूमारास भाजीपाला घेण्यासाठी गेला होता, भाजीपाला घेतल्यानंतर त्याने लोअरमध्ये पाहले असता त्याचा रेडमी नोट–९ प्रो मॅक्स कंपनीचा मोबाईल त्याला दिसला नाही, त्यामुळे त्याने आजूबाजूला पाहणी केली, तरी देखील मोबाईल सापडला नाही असे कथन केले. पुढे त्याने पोलिस स्टेशनला जाऊन फिर्याद (नि.क्र.०५) दिली असल्याचे सांगितले. पुढे महत्वाचे फिर्यादीने कथन केले की, त्याचा चोरी गेलेला मोबाईल एक वर्षानंतर कोर्टातून परत मिळाला असून, त्याला सदरची केस पूढे चालवायची नाही.

०७. अभियोगपक्षाने तपासलेल्या ऐकमेव साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, साक्षीदार क्र. ०१ अक्षय हा फिर्यादी आहे. परंतु फिर्यादीने त्याचा मोबाईल आरोपीने चोरी केल्याबाबत कोणतेही कथन केले नाही. याउलट फिर्यादीने त्याला त्याचा मोबाईल मिळाला असून त्याला सदरची केस पूढे चालवायची नसल्याचे तसेच तो आरोपीला ओळखत देखील नसल्याचे स्पष्ट कथन केलेले आहे. त्यामुळे अभियोगपक्षाने तपासलेल्या एकमेव साक्षीदार फिर्यादी याच्या पुराव्यातून आरोपीने फिर्यादीचा मोबाईल चोरी केला होता, याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर आल्याचे दिसून येत नाही.

०८. एकंदरीत अभियोग पक्षाने तपासलेल्या उपरोक्त एकमेव साक्षीदाराच्या पुराव्यात आरोपीविरुध्द कुठलेही कथन आलेले दिसून येत नाही. सबब, आरोपीस प्रस्तुत गुन्ह्यात दोषी ठरविण्याकरीता कुठलाही प्रत्यक्ष अथवा

परिस्थितीजन्य पुरावा अभिलेखावर येऊ शकला नाही. आरोपीविरुध्द कोणताही पुरावा समोर न आल्यामुळे आरोपीने घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी फिर्यादीचा मोबाईल चोरी केला होता, ही बाब पुराव्याअभावी सिध्द होवू शकली नाही. सबब, आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान, कलम ३७९ अन्वये गुन्हा सिध्द झाला नाही. म्हणून मी **मुददा क्र.१** चे उत्तर **नकारार्थी** देत आहे.

***मुद्दा क्र. २ करिताः–***

**०९.** मुद्दा क्र.१ च्या नकारार्थी निष्कर्षास अनुसरुन आरोपीस भारतीय दंड विधान, कलम ३७९ अन्वयेच्या गुन्हयातून निर्दोष मुक्त करणे न्यायोचित ठरते. आरोपीने यापूर्वीच फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये बंधपत्र व जामीनपत्र नव्याने दिली आहेत. म्हणून मुद्दा क्र.२ करिता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :–

## आदेश

१. **आरोपी दिनबंधू जगदिश शेंभेकर** यांची भारतीय दंड विधान, कलम ३७९ खालील शिक्षापात्र अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम २४८(१) अन्वये **निर्दोष मुक्तता** करण्यात येते.

२. प्रस्तूत प्रकरणातील जप्त मुद्देमाल **:– एक रेडीमी कंपनीचा मोबाईल –** सूपूर्तनाम्यावर फिर्यादीस परत करण्यात आल्यामुळे अपिल कालावधीनंतर त्याचा अंतरिम ताबा कायम करण्यात येतो.

**३**. आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येतात.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात टंकलिखीत करुन घोषीत करण्यात आला.)

Digitally signed by THAKUR PRADEEPSINGH
Date: 2026.05.04 17:36:20 +0530

सावनेर. **(प्रदिपसिंह पृ. ठाकूर)**

दिनांक ०४/०५/२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग

[न्यायालय क्र. ०१], सावनेर.